संगणक संकेतांक- २०१११०१५१७२७२९००१

**केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या मिहान व अन्य विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकासकांना / घटकांना आर्थिक सवलती देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय एसीझेड-२०१०/सीआर-५३४/उद्योग-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०११.

**वाचा** - १) शासन निर्णय क्र. एसीझेड-२००१/(१५२)/उद्योग-२, दिनांक १२ ऑक्टोबर २००१
२) शासन शुध्दीपत्रक क्र. एसीझेड-२००१/(१५२)/उद्योग-२, दिनांक २४ऑक्टोबर २००५.
३) शासन निर्णय क्र. एसझेड-२००५/(१०२८)/उद्योग-२, दिनांक १२ ऑक्टोबर २००७
४) दिनांक १४/०९/२०११ रोजी झालेल्या राज्यं मंत्रीमंडळ बैठकीचे कार्यवृत्त.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (विधेयक क्र. २८/२००५ ) अन्वये देशामध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास व्हावा, निर्यातीस चालना मिळावी व मोठया प्रमाणात रोजगार निर्मीती व्हावी यासाठी कायदा केला आहे. सदर कायदयातील कलम ५० मधील पोट कलम (अ) अनुसार राज्य शासनाला विविध कायदयांतर्गत प्रचलित कर, फी, डयुटी यामधून विकासकांना व घटकांना सूट देणे आणि त्यानुषगांने नवीन कायदा बनविण्याची शक्ती प्रदान करण्यात आली आहे. उक्त तरतुदीचा सातत्याने विचार करुन केंद्र शासनाने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत नागपूर येथे विकसित करण्यात येत असलेला मिहान विशेष आर्थिक क्षेत्रातील विकासकांना / घटकांना, राज्य शासनाने दि. २०.४.२०१० रोजी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान सभेंत मान्यतेसाठी दाखल केलेले व चर्चेसाठी प्रलंबित राज्य विशेष आर्थिक क्षेत्र विधेयक, २०१० या विधेयकास मान्यता मिळेपर्यंतच्या कालावधीत सदर क्षेत्रांच्या विकासकांना / घटकांना आर्थिक सवलती देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय -**

देशामध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास व्हावा, निर्यातीस चालना मिळावी व मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी याकरिता खाजगी क्षेत्राकडून गुंतवणूकीच्या माध्यमातून तसेच सार्वजनिक क्षेत्राद्वारेही पायाभूत सुविधांचा विकास व्हावा आणि विविध निर्यातक्षम उद्योग उभारले जावेत यासाठी केंद्र शासनाच्या विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ३(१०) मधील तरतुदीनुसार राज्यातील अधिसूचित विशेष आंर्थिक क्षेत्रांचे विकासक तसेच त्यातील घटकांना खालील विविध आर्थिक सवलती देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(१) विशेष आर्थिक क्षेत्रातील विकासकांना तसेच घटकांना त्यांच्या खरेदीवर महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ मधील तरतुदीनुसार आकारण्यात येणाऱ्या मूल्यवर्धित कराचा पूर्ण भरणा

केल्यानंतर, अशा विकासकांना अथवा घटकांना महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमाच्या अधीन राहून, अशा कराचा कालबध्द पध्दतीने परतावा देण्यात यावा.

(२) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार आकारण्यात येणाऱ्या अकृषिक आकारणीतून सूट देण्यात यावी.

(३) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार आकारण्यात येणाऱ्या गौण खनिजांच्या स्वामित्वधन आकराणीमधून सूट देण्यात यावी.

२. उपरोलिखित आर्थिक सवलती, केंद्र शासनाने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रातील प्रोसेसिंग एरियाच्या संदर्भात विकासकांना व त्यातील घटकांना ज्या-ज्या बाबींवर विविध सवलती अनुज्ञेय केलेल्या आहेत / करतील त्या-त्या बाबीवर त्या त्या क्षेत्राच्या संदर्भात विकासकांना व त्यातील घटकांना अनुज्ञेय राहतील.

३. उपरोल्लिखित आर्थिक सवलती पुढील २५ वर्षाकरिता किंवा प्रस्तावित महाराष्ट्र विशेष आर्थिक क्षेत्र व नेमून दिलेली क्षेत्र अधिनियम, २०१० हे विधेयक पारित होईल यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीकरीता, लागू होतील.

४. उपरोल्लिखित आर्थिक सवलती महाराष्ट्र विशेष आर्थिक क्षेत्र व नेमून दिलेली क्षेत्र अधिनियम, २०१० या विधेयकातील कलम ३ (१०) अन्वये अधिसूचित केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांचे विकासक तसेच त्यातील घटकांना अनुज्ञेय राहील.

५. उपरोक्त सूट / प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यासाठी आवश्यक ती अधिसूचना वित्त विभाग व महसूल व वन विभागाकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

६. हा आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३६/२०११/कराधान-१, दि.११/१०/२०११ च्या सहमतीने व महसूल व वन विभागाशी सल्लामसलत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( व्यं. ह. कुलकर्णी )

महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति :

१. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
४. सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई ३२.
५. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालयासमोर, मुंबई ३२.
६. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव

७. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
८. मा.मुख्यसचिव यांचे वरीष्ठ स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पू), मुंबई
११. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, निर्मल, नरीमन पॉईन्ट, मुंबई.
१२. विभागीय आयुक्त, पुणे / नाशिक/ नागपूर / औरंगाबाद / अमरावती/ मुंबई
१३. महानिरिक्षक, नोंदणी व नियंत्रक, मुंद्रांक शुल्क, पुणे
१४.निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई
१५.अधिक्षकीय उद्योग अधिकारी (माहिती तंत्रज्ञान), उद्योग संचालनालय, मुंबई ३२
१६.संचालक, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया, पुणे.
१७.उप महानिरिक्षक, मुंद्रांक शुल्क, मुंबई
१८.उद्योग विभागातील सर्व सहसचिव / उप सचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी
१९.कक्ष अधिकारी (ल-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. निवड नस्ती (उद्योग-२)